# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
# Maharashtra University of Health Sciences, Nashik
वणी - दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२००४.
Vani – Dindori Road, Mhasrul, Nashik – 422 004.
**EPABX :** 0253-2539100-300, **Fax :** 0253-2539171, **Phone :** 0253-2539173
**E-mail :** sw@muhsnashik.com **Web.:** www.muhsnashik.com

**डॉ. काशिनाथ दा. गर्कळ**
एम.एस्सी.,पीएच.डी
**संचालक - विद्यार्थी कल्याण**

*All correspondence be addressed to the Registrar.*

**Dr. Kashinath D. Garkal**
M.Sc., Ph.D
**Director – Students' Welfare**

मआविवि/एसडब्ल्यू/स्किम/१५६२/११ दि. २५/११/२०११

**- परीपत्रक -**

**प्रति,**
**मा. अधिष्ठाता/प्राचार्य,**
**सर्व संलग्नित महाविद्यालये**

**विषय : धन्वंतरी विद्याधन योजना, कमवा व शिका योजना आणि सावित्रीबाई फुले - मुलींकरीता शिष्यवृत्ती योजनेबाबत...**

उपरोक्त विषयांस अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०११-१२ करीता विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयांमध्ये पदवीपूर्व नियमित शिक्षण घेत असलेल्या गरीब, गरजु, व हुशार विद्यार्थ्यांचे प्रस्ताव खाली नमुद केलेल्या अटी व शर्तीनुसार **दिनांक ३१/०१/२०१२ पर्यंत विद्यापीठास सादर करावेत.**

विद्यार्थी कल्याण कार्यकारी मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार सुधारित नियमावली तयार करण्यात आली आहे. सदर नियमावलीस व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली असुन या नियमावलीनुसार व विद्यापीठाच्या प्राधिकरणाने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयानुसार अनुदानाचे वाटप करण्यात येईल.

## धन्वंतरी विद्याधन योजना, सावित्रीबाई फुले योजना व कमवा शिका योजनांची सर्वसाधारण नियमावली.

१) धन्वंतरी विद्याधन योजनेकरीता व कमवा व शिका योजनेकरीता विद्यार्थी दरवर्षी पास होणे आवश्यक आहे.

२) सर्व योजनांसाठी नापास, बहिस्थ, पदव्यूत्तर, (Post Graduation) व आंतरवासियता (Internship) विद्यार्थ्यांचे प्रस्ताव अपात्र ठरविण्यात येतील.

३) विद्यार्थ्याने महाविद्यालयामार्फत सादर केलेला कोणताही अपुर्ण प्रस्ताव व विद्यापीठाने ठरवून दिलेल्या नियमाप्रमाणे व सुचनांप्रमाणे नसल्यास कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. तसेच विद्यार्थी किंवा पालक यांच्याकडून प्राप्त तक्रारीची संपूर्ण जबाबदारी महाविद्यालयांची असेल.

४) विहित नमुन्यात नसलेले व निर्धारित मुदतीनंतर विद्यापीठास प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर कोणताही विचार केला जाणार नाही. यासंबधी टपालाव्दारे होणाऱ्या विलंबास संबधीत महाविद्यालय जबाबदार राहील. तसेच फॅक्स, इ-मेलव्दारे आलेले प्रस्ताव व कागदपत्रांवर कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली जाणार नाही.

५) सर्व योजनांकरीता दुसऱ्या देशात मुळ वास्तव्य असलेले **(NRI)**, परराज्यातून आलेले **(OMS)** विद्यार्थ्यांचे प्रस्ताव अपात्र ठरविण्यात येईल.

६) सर्व योजनांचा पात्र विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक कारकीर्दीमध्ये दरवर्षी एका पेक्षा जास्त योजनांचा लाभ देण्यात येईल.

७) सर्व योजनांकरीता प्रत्येक योजनेचे लाभार्थी ठरविण्यासाठी सर्व घटकांचा व शासनाच्या धोरणांचा विचार करुन विद्यार्थ्यांना लाभ देण्यात येईल.

८) सर्व योजनांकरीता सादर केलेले सर्व दस्तऐवज वाचणीय असावेत व सक्षम प्राधिकृत अधिकाऱ्यांची स्वाक्षरी व शिक्कयासह प्रमाणित केलेले असणे आवश्यक आहे.

९) विद्यार्थ्यांनी अर्ज स्वहस्तक्षरात, ठळक व विहित नमुन्यात भरणे अपेक्षित आहे. विद्यार्थ्याचे अस्पष्ट (Illegible) अपूर्ण अर्ज प्राप्त झाल्यास विद्यापीठ या संदर्भात कोणतीही कार्यवाही करणार नाही.

१०) विद्यापीठ परिपत्रकाव्दारे वेळोवेळी कळविण्यात आलेल्या अटी व शर्तीचे पालन करणे महाविद्यालय व विद्यार्थ्यावर बंधनकारक असेल.

११) विद्यापीठाच्या योजना हया विद्यार्थ्यांना मिळणारी सवलत आहे. त्यांचा हक्क नाही असे त्यांना अवगत करण्यात यावे.

१२) सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेसाठी लागू असलेल्या हमीपत्रातील रकान्यामध्ये (-) अशी खुण न करता **"लागू नाही"** असा स्पष्ट उल्लेख असावा. हमीपत्रावर महाविद्यालयांचे अधिष्ठाता / प्राचार्यांची सही व शिक्का असणे अनिवार्य आहे.

१३) सर्व अटी व शर्तीबाबत निर्णय घेण्याचे अधिकार विद्यापीठाने राखीव ठेवलेले आहेत.

१४) सादर केलेल्या दस्तऐवजांमध्ये कालांतराने कोणतेही कागदपत्र खोटे असल्याचे सिध्द झाल्यास संबधीत विद्यार्थ्यावर कायदयानुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

१५) योजनांचा लाभ घेताना लाभार्थी विद्यार्थी जबाबदार असेल व किंबहूना त्यापेक्षाही अधिक जबाबदारी महाविद्यालयांच्या अधिष्ठाता / प्राचार्यांची असेल.

१६) योजनांच्या अनुषंगाने प्रस्तावासोबत लागणारे विहित नमुन्यातील कागदपत्रे सादर करण्याची जबाबदारी विद्यार्थ्याची व विद्यार्थ्यांच्या पालकांची तसेच महाविद्यालयाच्या अधिष्ठाता/प्राचार्यांची असेल. एखादया कागदपत्राच्या अनुषंगाने विद्यार्थ्याचा प्रस्ताव अपात्र ठरविल्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.

## अ) धन्वंतरी विद्याधन योजना :

१) विद्यार्थ्यांनी शिक्षणाकरीता बँकेकडून कर्ज किंवा मंजूर झालेल्या कर्जापैकी दरवर्षी कर्ज हप्त्याची रक्कम उचललेली असेल. अशा नियमित पदवीपूर्व शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांसाठी लागू असेल.

२) महाविद्यालयांकडून प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांच्या प्रस्तावांना व्याज अनुदानाचे परिगणना (Calculation) करण्यासाठी विद्यार्थ्याने प्रत्येक वर्षाकरीता प्रवेश घेतलेल्या शैक्षणिक वर्षापासुन म्हणजेच ०१ ऑगस्ट पासुन पुढील संपूर्ण वर्ष ग्राहय धरुन तद्नंतर येणारे अर्थिक वर्ष म्हणजेच ३१ मार्च पर्यंत, २० महिन्यांचा कालावधी विचारात घेवून ज्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक कर्ज घेतले असेल अशा सर्व विद्यार्थ्यांचे प्रस्ताव पात्र ठरविण्यात येतील. (उदा : ०१ ऑगस्ट २०१० ते ३१ मार्च २०१२ या कालावधीमध्ये)

३) शिक्षणशुल्क समितीने महाविद्यालयासाठी आकारावयाचे शुल्क विचारात न घेता विद्यार्थ्यांने २० महिन्यांच्या कालावधीमध्ये ज्या महिन्यात शैक्षणिक कर्ज घेतले असेल, तो महिना सोडून त्याच्या पुढील महिन्यापासुन कर्ज रक्कमेवरील व्याज अनुदानाचे परिगणना आगामी येणाऱ्या आर्थिक वर्षापर्यंत किंवा जास्तीत जास्त १२ महिन्यांसाठी करण्यात येईल.

४) प्रस्तावासोबत सादर केलेल्या बॅंक स्टेटमेंटमध्ये किंवा बॅंक व्यवस्थापकांच्या पत्रामध्ये प्रत्यक्ष आकारण्यात आलेला व्याज दर किंवा जास्तीत जास्त १५ % व्याजदर या पैकी जो कमी असेल त्या दराने कर्ज रक्कमेवरील व्याजाची परिगणना करण्यात येईल.

५) एखादया विद्यार्थ्याने प्रस्तावासोबत सादर केलेल्या कागदपत्रांपैकी बॅंक स्टेटमेंटमध्ये किंवा बॅंक व्यवस्थापकांच्या पत्रामध्ये व्याज दराचा उल्लेख केलेला नसेल, तर अशा विद्यार्थ्याचे प्रस्ताव अपात्र ठरविण्यात येतील.

६) विद्यार्थ्यांनी ज्या बॅंकेकडून कर्ज घेतले आहे अशा संबंधीत बॅंकेच्या नावे व्याज अनुदानाची रक्कम धनाकर्षाव्दारे संबंधीत विद्यार्थ्यांना प्राचार्यांमार्फत वाटप करण्यात येईल.

७) महाविद्यालयांकडून आलेल्या प्रस्तावांची छाननी करताना कमाल संख्या विचारात न घेता ज्या विद्यार्थ्यांनी प्रस्ताव सादर करतांना त्याच्या शैक्षणिक वर्षामध्ये बॅंकेकडून कर्ज घेतले असेल किंवा मंजूर करण्यात आलेल्या कर्जापैकी, कर्ज हप्त्याची रक्कम उचललेली असेल अशा सर्व विद्यार्थ्यांचे प्रस्ताव पात्र ठरविण्यात येईल.

८) विद्यार्थ्याने महाविद्यालयाकडे सादर केलेल्या प्रस्तावातील सर्व कागदपत्रांची छाननी करुन पात्र ठरलेले सर्व प्रस्ताव प्राचार्यांनी शिफारस पत्रासह पाठवावे.

९) विद्यार्थ्यास भारत सरकार/शासनाच्या किंवा अन्य संस्थाकडून शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, फेलोशिप शुल्क परतावा, फी सवलत किंवा इतर काही अनुदान मिळत असले तरी दखील सदर विद्यार्थ्यांचे प्रस्ताव पात्र ठरविण्यात यावे. या करीता विद्यार्थ्यांकडून हमीपत्र घेण्याची आवश्यकता नाही.

१०) विद्यार्थ्यांच्या पालकांची १२ महिन्यांची उत्पन्नाची कमाल मर्यादा रुपये ६ लक्ष इतकी ठेवण्यात आली आहे. पात्र विद्यार्थ्यांची यादी तयार करताना ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न सर्वात कमी असेल अशा विद्यार्थ्यांना प्रथम प्राधान्य देऊन, चढत्या भाजणीने तयार करण्यात येईल व विद्यापीठाच्या दरवर्षी अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात केलेल्या तरतूदीनुसार कमाल मर्यादेत अनुदानाचे वाटप करण्यात येईल.

## विद्यार्थ्याने प्रस्तावा सोबत जोडावयाची कागदपत्रे. (धन्वंतरी विद्याधन योजना)

१) (अ.) विद्यार्थ्याचा विनंती अर्ज. (सहपत्र नमुना - I ) (ब.) विद्यार्थ्याचे माहितीपत्रक (सहपत्र नमुना - II) (क.) प्राचार्यांचे शिफारस पत्र. (सहपत्रे सदर परिपत्राकासोबत जोडलेले आहेत.)

२) गतवर्षी पास झालेल्या परिक्षेच्या गुणपत्रकाची साक्षांकित प्रत.

३) पालकांच्या उत्पन्नाचा दाखला (तहसीलदारांचा किंवा तलाठयाचा किंवा कोर्टाचा किंवा फॉर्म १६ ची प्रत किंवा कर आकारणी कार्यालयाचा इ. दाखले फक्त धन्वंतरी विद्याधन योजनेसाठी ग्राहय धरण्यात यावेत.)

४) विद्यार्थ्याने त्यांच्या प्रत्येक शैक्षणिक वर्षामध्ये ०१ ऑगस्ट २०१० नंतर घेतलेले शैक्षणिक कर्ज किंवा मंजूर झालेल्या कर्जापैकी प्रत्यक्ष वाटप करण्यात आलेल्या कर्जाचे व कर्जावरील व्याजदरासह होणाऱ्या व्याज रक्कमेचा उल्लेख असलेले बॅंकेचे मुळ स्टेटमेंट.

५) अर्थिक वर्षापर्यंत विद्यार्थ्यांना प्रत्यक्षपणे वाटप करण्यात आलेले कर्ज व त्यावरील व्याजदरासह होणाऱ्या व्याज रक्कमेचा उल्लेख असलेले बॅंक व्यवस्थापकांचे सही शिक्क्यासह मुळ पत्र. (सहपत्र नमुना III )

६) प्रस्तावासोबत जोडलेली सर्व कागदपत्रे अधिकृत अधिकाऱ्यांकडून सांक्षाकिंत करणे आवश्यक आहे.

## सावित्रीबाई फुले – मुलींकरीता शिष्यवृत्ती योजना :

१) सदर योजनेचा लाभ फक्त पदवीपूर्व नियमित शिक्षण घेणाऱ्या गरीब व गरजू विद्यार्थीनींसाठी देण्यात येईल.

२) प्रस्ताव विद्यापीठास पाठविण्यापूर्वी, विद्यार्थीनीने सादर केलेला प्रस्तावाची छाननी करुन ती पात्र आहे किंवा नाही आणि सदर योजनेची तिला आवश्यकता असल्याची पूर्ण खात्री करुनच एका महाविद्यालयातून फक्त दोन विद्यार्थीनीचे प्रस्ताव पाठवावे.

३) विद्यार्थीनीने सादर केलेल्या प्रस्तावातील सर्व कागदपत्रांची छाननी करुन आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे अधिष्ठाता/प्राचार्यांनी सांक्षाकित (Attested) करुन शिफारस पत्रासह विद्यापीठास सादर करावेत. विद्यार्थीनीने सादर केलेला प्रस्ताव अपुर्ण असेल व विद्यापीठाने ठरवून दिलेल्या नियमाप्रमाणे नसेल तर याबाबतचा कोणताही पत्रव्यवहार विद्यापीठाकडून केला जाणार नाही. तसेच विद्यार्थीनी किंवा पालक यांच्याकडून प्राप्त तक्रारीची संपुर्ण जबाबदारी महाविद्यालयांवर राहील.

४) सदर योजनेसाठी एका महाविद्यालयाकडून फक्त दोनच प्रस्ताव स्विकारण्यात येतील.

५) प्राप्त झालेल्या प्रस्तावांपैकी कमी उत्पन्न असलेला एक प्रस्ताव प्रथम विचारात घेतला जाईल. योजनेतील अनुदान शिल्लक राहील्यास दुसऱ्या प्रस्तावावर विचार करण्यात येईल. ज्या विद्यार्थीनींच्या पालकांचे उत्पन्न सर्वात कमी असेल अशा प्रत्येक महाविद्यालयातील पात्र प्रस्तावावर यथायोग्य विचार करुन प्रत्येकी रु. २०,०००/- याप्रमाणे अनुदानाची कमाल मर्यादा लक्षात घेवून विद्यार्थीनीला वाटप करण्यात येईल.

६) विद्यार्थीनीच्या पालकांची १२ महिन्याच्या उत्पन्नाची कमाल मर्यादा रुपये ३ लक्ष इतकी ठेवण्यात आलेली आहे. अनुदानाचे वाटप करताना विद्यार्थीनीच्या पालकाचे उत्पन्नाचा निकष लावून सर्वात कमी उत्पन्न असेल अशा विद्यार्थीनींना प्रथम प्राधान्य देऊन, चढत्या भाजणीने विद्यापीठाच्या दरवर्षी अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात केलेल्या तरतूदीनुसार कमाल मर्यादेत अनुदानाचे वाटप करण्यात येईल.

७) विहीत नमुन्यात नसलेल्या व निर्धारीत मुदतीनंतर विद्यापीठास प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेतला जाणार नाही. टपालाव्दारे होणाऱ्या विलंबासंबधी महाविद्यालय जबाबदार राहील. तसेच फॅक्स, इ-मेलव्दारे आलेले प्रस्ताव व कागदपत्रांवर कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही.

८) प्रस्ताव सादर करतांना विद्यार्थीनी गतवर्षी प्रथम प्रयत्नामध्ये (First Attempt) उतीर्ण होणे अनिवार्य आहे.

९) दुसऱ्या देशात वास्तव्य असलेले (NRI), परराज्यातून आलेले (OMS), असणाऱ्या विद्यार्थीनीं या योजनेस पात्र नाहीत.

१०) नापास, रिपिटर, बहि:स्थ, अेटीकेटी (ATKT), पदव्युत्तर (Post Graduation) व आंतरवासियता (Internship) असणाऱ्या विद्यार्थीनीचे प्रस्ताव अपात्र ठरविण्यात येतील.

११) विद्यार्थीनींना भारत सरकार/शासनाच्या किंवा अन्य संस्थाकडून शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, फेलोशिप शुल्क परतावा फी सवलत किंवा इतर काही अनुदान मिळत असेल किंवा मिळणार असेल अशा विद्यार्थीनींचे प्रस्ताव अपात्र ठरविण्यात येतील. या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या /घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थीनीकडून इतर कोणतीही सवलत घेत नाही. असे हमीपत्र घेण्यात यावे. (हमीपत्राचा नमुना III सोबत जोडलेला आहे.)

## विद्यार्थीनीने प्रस्तावासोबत जोडावयाची कागदपत्रे. (सावित्रीबाई फुले - शिष्यवृत्ती योजना)

१) (अ.) विद्यार्थीनीचा विनंती अर्ज. (सहपत्र नमुना - I), (ब.) विद्यार्थीनीचे माहितीपत्रक (सहपत्र नमुना - II), (क.) विद्यार्थीनीचे सुधारीत हमीपत्र (सहपत्र नमुना III) ड) प्राचार्यांचे शिफारस पत्र. (सर्व सहपत्रे सोबत जोडलेले आहे)

२) गतवर्षीच्या परिक्षेत प्रथम प्रयत्नामध्ये (First Attempt) उतीर्ण झालेल्या गुणपत्रकाची प्रत.

३) सक्षम प्राधिकृत अधिकाऱ्याने पालकांच्या उत्पन्नाचा मागील वित्तीय वर्षाचा दिलेला (Latest) दाखला (तहसीलदारांचा किंवा फॉर्म १६ ची प्रत.) इतर कोणत्याही प्रकारचा उत्पन्नाचा दाखला ग्राहय धरण्यात येणार नाही.

४) प्रस्तावासोबत जोडलेली सर्व कागदपत्रे अधिकृत अधिकाऱ्यांकडून सांक्षाकिंत करणे आवश्यक आहे.

## कमवा व शिका योजना

१) सदर योजनेचा लाभ पदवीपूर्व नियमित शिक्षण घेणाऱ्या गरीब व गरजू विद्यार्थ्यांसाठी लागू असेल.

२) सदर योजनेसाठी एका महाविद्यालयाकडून फक्त पाच प्रस्ताव स्विकारण्यात येतील.

३) कमवा व शिका योजनेतंर्गत महाविद्यालयातील पात्र ठरविण्यात आलेल्या विद्यार्थ्यांना कामाचा मेहनताना म्हणून दहा महिन्यांकरीता रु. १४,०००/- प्रती विद्यार्थी याप्रमाणे देण्यात येईल. तसेच महाविद्यालयाचे योगदान रु. २,०००/- असणे अपेक्षित आहे.
विद्यापीठाचे अनुदान प्रति तास रु. ३५ X २ तास X२० दिवस = रु. १,४००/- दरमहा X १० महिने = रु. १४,०००/- तसेच महाविद्यालयाचे योगदान म्हणून प्रति तास रु. ५ X २ तास X२० दिवस = रु. २००/- दरमहा X१० महिने = रु.२,०००/- अशाप्रकारे सुट्टयांचे दिवस वगळून दरमहा, दहा महिन्यांकरीता अनुदानाचे वाटप करण्यात यावे.

४) प्रस्ताव सादर करतांना विद्यार्थी मागील परिक्षेत उतीर्ण झालेला असावा.

५) नापास, बहिस्थ, पदव्यूत्तर (Post Graduation) व आंतरवासियता (Internship) हे विद्यार्थी या योजनेस पात्र नाहीत.

६) विद्यार्थ्यांना भारत सरकार/शासनाच्या किंवा अन्य संस्थाकडून शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, फेलोशिप शुल्क परतावा फी सवलत किंवा इतर काही अनुदान मिळत असलेल्या विद्यार्थ्याचे प्रस्ताव पात्र ठरविण्यात यावे. या करीता विद्यार्थ्यांकडून हमीपत्र घेण्याची आवश्यकता नाही.

७) विद्यार्थ्याच्या पालकांची १२ महिन्यांच्या उत्पन्नाची कमाल मर्यादा रु. ३ लक्ष इतकी ठेवण्यात आलेली आहे. अनुदानाचे वाटप करताना विद्यार्थ्याच्या पालकांचा उत्पन्नाचा निकष लावून सर्वात कमी उत्पन्न असेल अशा विद्यार्थ्यांना प्रथम प्राधान्य देऊन, चढत्या भाजणीने विद्यापीठाच्या दरवर्षी अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात केलेल्या तरतूदीनुसार कमालमर्यादेत अनुदानाचे वाटप करण्यात येईल.

८) दुसऱ्या देशात मुळ वास्तव्य असलेल्या (NRI), परराज्यातून आलेल्या (OMS) विद्यार्थी या योजनेस पात्र नाहीत.

९) या योजनेचा लाभ घेण्यासाठी अंतीम वर्षात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांचे प्रस्ताव पात्र ठरविण्यात येतील.

# <u>विद्यार्थ्याने प्रस्तावा सोबत जोडावयाची कागदपत्रे. (कमवा व शिका योजना)</u>

१) (अ.) विद्यार्थ्याचा विनंती अर्ज. (ब.) विद्यार्थ्यांचे माहितीपत्रक (सहपत्र नमुना - ब ) (क.) प्राचार्यांचे शिफारस पत्र (सहपत्र नमुना - अ ) (सहपत्रे सोबत जोडलेले आहे.)

२) गतवर्षी पास झालेल्या परिक्षेच्या गुणपत्रकाची प्रत.

३) पालकांच्या उत्पन्नाचा दाखला (तहसीलदारांचा किंवा तलाठयाचा किंवा कोर्टाचा किंवा फॉर्म १६ ची प्रत किंवा कर आकारणी कार्यालयाचा इ. दाखले फक्त कमवा व शिका योजनेसाठी ग्राहय धरण्यात येतील.)

४) प्रस्तावासोबत जोडलेली सर्व कागदपत्रे अधिकृत अधिकाऱ्यांकडून सांक्षाकिंत करणे आवश्यक आहे.

विद्यार्थी कल्याण कार्यकारी मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार सदर योजनांसाठी तयार करण्यात आलेल्या माहितीपुस्तिकेत कार्यकारी मंडळाने योजनांच्या अंमलबजावणी संबधी निर्माण झालेल्या अडचणींवर चर्चा करुन केलेल्या ठरावानुसार नियमावलीत उपरोक्त बदल केलेले आहेत. माहितीपुस्तिकेत नमुद केलेल्या काही नियमांमध्ये उपरोक्तप्रमाणे योजनेतंर्गत बदल केलेले आहेत. विद्यापीठाच्या प्राधिकरणाने वेळोवेळी नियमामध्ये योजनेअंतर्गत केलेली सुधारणा सर्व महाविद्यालयांना व अर्जदारांना लागु असेल. कृपया याची नोंद घ्यावी.

महाविद्यालयांच्या अधिष्ठाता / प्राचार्यांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त नियमावली अंतर्गत पात्र विद्यार्थ्यांचे प्रस्ताव महाविद्यालयांच्या कव्हरींग लेटरवर शिफारशीसह दि.३१/०१/२०१२ या तारखेपर्यंत विद्यापीठास प्राप्त होतील अशा पध्दतीने पाठवावेत. **उशिरा तथा विलंबाने प्राप्त झालेल्या कोणत्याही प्रस्तावावर विद्यापीठ कार्यवाही करणार नाही. तसेच योजने सबंधीचे प्रस्ताव / अर्ज/ कागदपत्रे विद्यार्थी कल्याण विभागात परस्पर स्वीकारले जाणार नाहीत. कृपया याची नोंद घ्यावी.**

उपरोक्त योजनांची सविस्तर माहिती सर्व विद्यार्थ्यांना मिळावी या दृष्टीकोनातुन योजनांबाबतचा तपशील विद्यापीठाच्या <u>www.muhsnashik.com</u> या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदर योजना पुस्तिकांच्या प्रती पत्रासोबत जोडून पाठवित आहोत.

धन्यवाद !

**सही/-**
संचालक,
विद्यार्थी कल्याण

# नमुना - I

## वर्ष २०११ - १२ करीता धन्वंतरी विद्याधन योजनेसाठीचा विनंती अर्ज

पासपोर्ट आकाराचा फोटो

अर्जदाराचे नाव :

संपुर्ण पत्ता :

**मा. संचालक,**
**विद्यार्थी कल्याण,**
महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,
नाशिक.

महोदय,

विद्यापीठाच्या धन्वंतरी विद्याधन योजनेनुसार उपलब्ध असलेल्या शैक्षणिक कर्जावरील व्याज रकमेचे अनुदान मिळावे म्हणून मी इच्छुक असून कृपया सदर योजनेचा लाभ मला मिळावा. तथापि मला सन .................. (वर्ष नमुद करावे) या शैक्षणिक वर्षामध्ये या योजनेचा लाभ मिळालेला आहे. / नाही.

धन्वंतरी विद्याधन योजनेच्या सर्व अटी व शर्ती जानुन घेतल्या आहेत व त्यांचे पालन करणे माझेवर बंधनकारक राहील हे मी मान्य करतो.

**सही :**
**विद्यार्थ्यांचे नाव :**
**दिनांक :**

**महाविद्यालयाचा शिक्का** **अधिष्ठाता / प्राचार्याची सही**

# नमुना – II

## २०११ - १२ करीता धन्वंतरी विद्याधन योजना

| अ.क्र. | तपशिल | महिती |
|---|---|---|
| १ | महाविद्यालयाचे नाव व पत्ता | |
| २ | विद्यार्थ्याचे संपूर्ण नाव व पत्ता | |
| ३ | मोबाईल नंबर / दुरध्वनी क्र. (STD) कोडसह | |
| ४ | विद्यार्थ्याचा कायम निवासी पत्ता | |
| ५ | जन्म तारीख व वय | |
| ६ | सध्या शिकत असलेला वर्ग आणि कोर्स | |
| ७ | महाविद्यालयात शिकत असलेल्या वर्गाचे आकारण्यात आलेले शैक्षणिक शुल्क | |
| ८ | गतवर्षी उत्तीर्ण वर्ग व गुण (गुणपत्राची प्रत जोडावी) | |
| ९ | मागासवर्गीय असल्यास प्रकार (होय असल्यास जातीच्या दाखल्याची प्रत जोडावी) | होय / नाही वर्गवारी : |
| १० | शारिरीक अपंगत्व असल्यास (होय असल्यास अंपगत्वाच्या प्रमाणपत्राची प्रत जोडावी) | होय / नाही |
| ११ | विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी आहे काय ? | होय / नाही |
| १२ | पालकांचे संपूर्ण नाव | |
| १३ | पालकांशी विद्यार्थ्यांचे नाते | |
| १४ | पालकांचा संपूर्ण पत्ता व दुरध्वनी क्र. (STD) कोडसह/ मोबाईल क्रमांक : | |
| १५ | पालकांचा व्यवसाय / नोकरी | |
| १६ | पालकांचे वार्षिक उत्पन्न (सक्षम अधिकाऱ्यानी दिलेला उत्पन्नाचा दाखला सोबत जोडावा. ) | |
| १७ | पालकांची नोकरी / व्यवसायाचा पत्ता | |

**दि. / /२०११**

**स्थळ :** **विद्यार्थ्यांची सही**

**अधिष्ठाता / प्राचार्याची सही व शिक्का**

# नमुना - III
## ON BANK LETTER HEAD

प्रती,

**मा. संचालक,**
विद्यार्थी कल्याण विभाग,
मआविवि, नाशिक.

**विषय** : शैक्षणिक कर्जावरील व्याजाच्या परताव्याबाबत...

**संदर्भ** : विद्यापीठाची धन्वंतरी विद्याधन योजना.

| क्र. | तपशील | माहिती |
|---|---|---|
| १. | बॅंकेचे नाव, पत्ता व दुरध्वनी क्र. | |
| २. | बॅंक राष्ट्रीयकृत / शेडयूल बॅंक / सहकारी शेडयूल बॅंक किंवा इतर कोणती आहे. | |
| ३. | कर्ज घेतलेल्या विद्यार्थ्याचे नाव | |
| ४. | महाविद्यालयाचे नाव | |
| ५. | शिकत असलेला वर्ग व अभ्यासक्रम | |
| ६. | बॅंकेने मंजूर केलेले कर्ज व दिनांक | अक्षरी रु.<br>अंकी रु. दि. |
| ७. | ०१ ऑगस्ट २०१० ते ३१ मार्च २०१२ पर्यंत बॅंकेने मंजूर केलेल्या कर्जापैकी वाटप केलेली रक्कम (२० महिन्यांच्या कालावधीकरीता) | अक्षरी रु.<br>अंकी रु. |
| ८. | ०१ ऑगस्ट २०१० ते ३१ मार्च २०१२ पर्यंत वाटप करण्यात आलेल्या रकमेचा व्याज दर व व्याजाची रक्कम. ( फक्त १२ महिन्यांसाठी आकारण्यात यावी.) | व्याज दर : %<br>व्याजाची होणारी रक्कम<br>अक्षरी रु. :<br>अंकी रु. : |

**बॅंक व्यवस्थापकाची सही व शिक्का**

**टिप :** कर्ज रक्कमेवरील व्याज अनुदानाचे परिगणित दि. ०१ ऑगस्ट २०१० पासुन ते ३१ मार्च २०१२ पर्यंत या २० महिन्यांच्या कालावधीमध्ये ज्या महिन्यात शैक्षणिक कर्ज घेतले असेल तो महिना सोडून त्याच्या पुढील महिन्यापासुन कर्ज रक्कमेवरील व्याज अनुदानाचे परिगणित अगामी येणाऱ्या अर्थिक वर्षापर्यंत किंवा जास्तीत जास्त १२ महिन्यांकरीता करण्यात यावे.

**टीप** : पत्रासोबत ०१/०८/२०१० नंतरचे विद्यार्थ्यांने घेतलेल्या शैक्षणिक कर्जाचे बॅंक स्टेटमेंट जोडावे (बॅंक स्टेटमेंटमध्ये आकारण्यात आलेली व्याज रक्कम व कर्जाचा व्याजदर याचा स्पष्ट उल्लेख असावा.)

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
# Maharashtra University of Health Sciences, Nashik
वणी - दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२००४.
Vani – Dindori Road, Mhasrul, Nashik – 422 004.
**EPABX :** 0253-2539100-300, **Fax :** 0253-2539171, **Phone :** 0253-2539173
**E-mail :** sw@muhsnashik.com **Web.:** www.muhsnashik.com

**डॉ. काशिनाथ दा. गर्कळ** **Dr. Kashinath D. Garkal**
एम.एस्सी.,पीएच.डी M.Sc., Ph.D
**संचालक - विद्यार्थी कल्याण** *All correspondence be addressed to the Registrar.* **Director – Students' Welfare**


मआविवि/एसडब्ल्यू/स्किम/१५६३/११ दि. २५/११/२०११

**- परीपत्रक -**

**प्रति,**
**मा. अधिष्ठाता/प्राचार्य,**
सर्व संलग्नित महाविद्यालये

**विषय :- सावित्रीबाई फुले - मुलींकरीता शिष्यवृत्ती योजनेच्या हमीपत्रात बदल केल्याबाबत...**

महोदय /महोदया,

परिपत्रकासोबत जोडलेल्या विषयांकीत योजना पुस्तिकेतील विद्यार्थीनीचे हमीपत्र नमुना ( III ) मध्ये बदल करण्यात आला आहे. बदल करण्यात आलेल्या सुधारित हमीपत्राची प्रत सदर परिपत्रकासोबत जोडून पाठवित आहोत. याची कृपया नोंद घ्यावी.

आपणांस विनंती करण्यात येते की, विद्यार्थीनीने प्रस्ताव सादर करताना सुधारित हमीपत्राची प्रत नमुना ( III ) सादर केल्याची खात्री करुनच विद्यार्थीनीचा प्रस्ताव विद्यापीठाकडे पाठवावा.

धन्यवाद !

**सही/-**
संचालक,
विद्यार्थी कल्याण

# नमुना - III

## ON COLLEGE LETTER HEAD

## सावित्रीबाई फुले - मुलींकरीता शिष्यवृत्ती योजना

### विद्यार्थीनीचे हमीपत्र २०११ -१२ (सुधारीत)

(हमीपत्रातील सर्व रकाने स्पष्टपणे भरावेत. जो रकाना लागू नाही त्या रकान्यामध्ये (-) अशी खुण न करता **लागू नाही** असे लिहावे.)

| अ.क्र. | तपशील | माहिती |
|---|---|---|
| १ | विद्यार्थीनीचे नाव | |
| २ | कायम रहिवासी पत्ता | |
| ३ | शिकत असलेले वर्ष | |
| ४ | अभ्यासक्रम | |
| ५ | विद्यार्थीनीच्या जातीचा प्रवर्ग<br>**(SC / ST / VJNT / OBC / OPEN / Any other)** | |
| ६ | विद्यार्थीनीने शिक्षणासाठी प्रवेश घेतल्याचे माध्यम<br>( NRI / Management / MH-CET/ CBSE / Any other ) | |

मी सत्यप्रतिज्ञेवर असे लिहून देते की, मला **२०११ - २०१२** या शैक्षणिक वर्षाकरीता भारत सरकार/महाराष्ट्र शासन अथवा इतर संस्था यांच्याकडून पुढील फायदे मिळालेले आहेत/मिळणार आहेत.

| अ.क्र. | शिक्षणासाठी मिळत असलेल्या /मिळणार असलेल्या सवलतींचा तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| १ | शुल्क परतावा किंवा फी सवलत रक्कम | रु. |
| २ | शिष्यवृत्ती / फेलोशिप रक्कम | रु. |
| ३ | शिक्षण सहाय्य योजना रक्कम | रु. |
| ४ | भारत सरकार / महाराष्ट्र शासन अथवा इतर संस्था यांच्याकडुन रक्कम | रु. |

**वर नमुद केलेल्या १ ते ४ पैकी शैक्षणिक शुल्क सवलतीसाठी संस्थेकडे /कार्यालयाकडे अर्ज दाखल केला असल्यास त्यासबंधी सविस्तर माहिती खाली नमुद करावी.**

______________________________________________

______________________________________________

सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी, योजनेबाबत असलेल्या सर्व नियमांचे मी पालन करीन. या संदर्भात नियमात बदल करण्याचे सर्व हक्क विद्यापीठाकडे असतील तसेच सदर अनुदान हे विद्यापीठ निधीतून सवलतीच्या स्वरुपात मिळत असुन तो माझा हक्क नाही याची मला जाणीव आहे. मी असेही जाहीर करते की, सदर अर्जात नमुद केलेली सर्व माहिती खरी आहे. ही माहिती खोटी असल्यास / तफावत आढळल्यास मी योग्य त्या शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र असेन.

**विद्यार्थीनीचे नाव व सही :**
**दिनांक :**

**पालकांचे नाव व सही :**
**दिनांक :**

मी असे प्रमाणित करतो /करते की, सदर विद्यार्थीनीस भारत सरकार /महाराष्ट्र शासन अथवा इतर संस्थामधून तिच्या शिक्षणासाठी कोणत्याही प्रकारचे अर्थिक लाभ, शुल्क माफ किंवा शुल्क परतावा मिळत नाही/मिळणार नाहीत.

**महाविद्यालयाचा शिक्का**

**अधिष्ठाता / प्राचार्याची सही**

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
## Maharashtra University of Health Sciences, Nashik
वणी - दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२००४.
Vani – Dindori Road, Mhasrul, Nashik – 422 004.
**EPABX :** 0253-2539100-300, **Fax :** 0253-2539171, **Phone :** 0253-2539173
**E-mail :** sw@muhsnashik.com **Web.:** www.muhsnashik.com

**डॉ. काशिनाथ दा. गर्कळ** **Dr. Kashinath D. Garkal**
एम.एस्सी.,पीएच.डी M.Sc., Ph.D
**संचालक - विद्यार्थी कल्याण** *All correspondence be addressed to the Registrar.* **Director – Students' Welfare**


मआविवि/एसडब्ल्यू/स्किम/१५६४/११ दि. २५/११/२०११

प्रति,

**- परीपत्रक -**

**मा. अधिष्ठाता/प्राचार्य,**

सर्व संलग्नित महाविद्यालये

**विषय : संजिवनी विद्यार्थी अपघात सुरक्षा विमा योजना, पुस्तकपेढी योजना व बहिःशाल शिक्षण मंडळ योजनेबाबत...**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तीमत्व विकासासाठी विद्यापीठाच्या विविध उपक्रमांच्या माध्यमातून सतत प्रयत्न केले जात आहेत. आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाचा विद्यार्थी मुळातच हुशार समजला जातो. मात्र आर्थिक किंवा सामाजिक अडचणीमुळे त्याला उच्च शिक्षणात अडचणी येवू नयेत यासाठी विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागामार्फत विद्यार्थ्यांच्या हितासाठी विविध कल्याणकारी योजना सुरु केल्या आहेत. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून विषयांकीत योजना विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागामार्फत राबविण्यात येत आहेत. शैक्षणिक वर्ष २०११-१२ करीता पुस्तक पेढी व बहिःशाल शिक्षण मंडळ योजनेकरीता विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयाचे प्रस्ताव/ अर्ज दि. ३१/०१/२०१२ पर्यत मागविण्यात येत आहे. सदर योजनांची सविस्तर माहिती, अर्जाचे नमुने परीपत्रकासोबत जोडलेल्या माहितीपुस्तिकेत नमुद केलेली आहेत.

**- योजनांची थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे -**

**१) संजिवनी विद्यार्थी अपघात सुरक्षा विमा योजना :** विद्यापीठांतर्गत सर्व संलग्नित महाविद्यालयात नियमित शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचा अपघात झाल्यास / अपघातामुळे शारिरीक नुकसान झाल्यास किंवा दुर्देवाने अपमृत्यू झाल्यास होणाऱ्या हानीची थोडयाफार प्रमाणात का होईना भरपाई व्हावी या हेतुने सदर अपघात विमा योजना सुरु करण्यात आलेली आहे.

या योजनेचे मुख्य वैशिष्टे म्हणजे सर्व विद्यार्थ्यांच्या विम्याचा हप्ता (Premium ) विद्यापीठाने एकत्रीतरित्या **न्यु इंडिया एश्योरन्स विमा कंपनीला २८ मार्च २०१३ पर्यत** अदा केलेला आहे. त्यामुळे महाविद्यालयाने अथवा विद्यार्थ्यांने कोणत्याही प्रकारची प्रिमीयमची रक्कम विमा कंपनीला भरावयाची आवश्यकता नाही. त्याचप्रमाणे योजनेत सहभागी होण्यासाठी कोणत्याही प्रकारचा अर्ज, नोंदणी अथवा शुल्क भरावयाचे नाही. याची कृपया नोंद घ्यावी. मात्र विद्यार्थ्याचा अपघात /अपघाती मृत्यू झाल्यास विद्यार्थ्याने किंवा विद्यार्थ्याच्या पालकाने सोबत जोडलेल्या योजना पुस्तिकेत नमुद केले प्रमाणे तातडीने कार्यवाही करावयाची आहे. न्यु. इंडिया एश्योरन्स कंपनी लि., नाशिक यांच्या कडून दाव्याची रक्कम मिळणेकरीता प्राप्त झालेला विहित नमुन्यातील क्लेम फॉर्म सोबत जोडून पाठवित आहोत. सदर क्लेम फॉर्ममधील सर्व रकान्यातील माहिती भरुन प्राचार्यामार्फत मूळ दस्ताऐवजांसह विद्यापीठास विहित मुदतीत पाठविणे अनिर्वाय आहे.

२) **पुस्तक पेढी योजना :** विद्यापीठातंर्गत शिक्षण घेत असलेल्या संलग्नित महाविद्यालयातील आर्थिक दृष्टया दुर्बल व गरजू तसेच हुशार, नियमित पदवीपूर्व शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक अभ्यास क्रमाची पुस्तके खरेदी करुन विद्यार्थ्यांना उपलब्ध व्हावी हा मुख्य उद्देश या योजनेचा आहे. याकरीता महाविद्यालयाचे अधिष्ठाता / प्राचार्य यांनी त्यांच्या कॉलेजच्या **लेटरहेडवर** अनुदान मिळणे करीता विद्यापीठाकडे विनंती अर्ज सादर करावा. मिळालेल्या अनुदानातून पुस्तके खरेदी करुन विद्यापीठाच्या सोबत जोडलेल्या योजना पुस्तिकेत नमुद केलेल्या अटी व शर्तींच्या आधिन राहून पुस्तकांचे वाटप प्राचार्यांच्या शिफारशीनुसार ग्रंथालयामार्फत विद्यार्थ्यांना करण्यात यावे. पुस्तकांचे वाटप करतांना माहितीपुस्तिके अंतर्गत दिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. सदर योजनेकरीता विद्यार्थ्यांचे प्रस्ताव विद्यापीठाकडे पाठवू नये. तसेच योजनेबाबतीत विद्यार्थ्यांच्या तक्रारीचे निवारण करण्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयांच्या अधिष्ठाता/प्राचार्यांची असेल. याची कृपया नोंद घ्यावी.

**वर्ष २०११-१२** पासुन पुढे **प्रथम अर्ज प्रथम प्राधान्य** या तत्वाने दरवर्षी ज्या महाविद्यालयांचे प्रस्ताव प्राप्त होतील अशा महाविद्यालयांना रु. २०,०००/- अनुदानाचे वाटप करण्यात येईल. परंतू ज्या महाविद्यालयाने सदर योजनेचा लाभ यापूर्वी घेतला नसेल अशा महाविद्यालयांना प्रथम प्राधान्य देवून अनुदानाचे वाटप अंदाजपत्रकात करण्यात आलेल्या तरतुदीच्या कमाल मर्यादेत करण्यात येईल.

ज्या महाविद्यालयाने यापूर्वी योजनेचा **लाभ घेतला असेल परंतू हिशोबाचे समायोजन कलेले नसेल, अशा महाविद्यालयांना योजनेचा लाभ देण्यात येणार नाही.**

३) **बहि:शाल शिक्षण मंडळ :** विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तीमत्व विकासाला चालना देण्याकरीता महाविद्यालयबाहय उपक्रमांमध्ये सामाजिक कार्य घडवून आणणे व महाविद्यालय परिसरातील जनतेच्या सामाजिक जाणीवा सजग करुन जनजागृती निर्माण करण्याच्या दृष्टीने या सामाजिक जबाबदारीमध्ये विद्यापीठाचा थोडाफार हातभार असावा या हेतूने विद्यापीठाने सदर योजना सुरु केली आहे. त्यासाठी देण्यात येणारे अनुदानाकडे खर्चाची प्रतीपूर्ती म्हणून न पाहता सामाजिक बांधीलकी म्हणून पहावे असे अपेक्षित आहे. त्यामूळे प्राप्त अनुदानाचा विनियोग हा फक्त कार्यक्रम घेणे असा न ठेवता समाज जागृती व नवनिर्मितीच्या कामात आपला सहभाग असावा या उदात्त हेतूने या उपक्रमात भाग घ्यावा व सोबत जोडलेल्या योजनापुस्तिकेत नमुद केलेल्या अटी व शर्तींच्या आधीन राहून योजना राबवावी.

बहि:शाल शिक्षण मंडळ हा निव्वळ महाविद्यालयबाहय व्यक्तीमत्व विकासाचा उपक्रम न राहता समाज जागृती व नवनिर्माणाची चळवळ सुरु व्हावी या करीता आहे. सदर योजनेत सहभागी व्हायचे असल्यास महाविद्यालय स्तरावर बहि:शाल शिक्षण मंडळ स्थापन करुन योजनेचे अनुदान मिळण्यासाठी आपला प्रस्ताव योजनापुस्तिकेत नमुद केल्याप्रमाणे विहित नमुन्यात विद्यापीठाकडे पाठवावा.

**वर्ष २०११-१२** पासुन पुढे **प्रथम अर्ज प्रथम प्राधान्य** या तत्वाने दरवर्षी ज्या महाविद्यालयांचे प्रस्ताव प्राप्त होतील अशा महाविद्यालयांना रु. १०,०००/- अनुदान वाटप करण्यात येईल. परंतू ज्या महाविद्यालयाने सदर योजनेचा यापूर्वी लाभ घेतला नसेल अशा महाविद्यालयांना प्रथम प्राधान्य देवून विद्यापीठाच्या अंदाजपत्रकात करण्यात आलेल्या तरतुदीच्या कमाल मर्यादेत अनुदानाचे वाटप करण्यात येईल.

ज्या महाविद्यालयाने यापूर्वी योजनेचा लाभ घेतला असेल परंतू हिशोबाचे समायोजन कलेले नसेल अशा महाविद्यालयांना योजनेचा लाभ देण्यात येणार नाही.

महाविद्यालयांनी पुस्तक पेढी योजनेकरीता व बहिःशाल शिक्षण मंडळ या योजनेचा लाभ मिळण्यासाठी आपला प्रस्ताव/अर्ज **दि. ३१/०१/२०१२** पर्यंत विद्यापीठास प्राप्त होईल अशा प्रकारे पाठवावा. ज्या महाविद्यालयांकडे वर्ष २००७ -०८, २००८-०९, २००९-१०, २०१०-११, या करीता दिलेल्या अनुदानाचे हिशोब प्रलंबित असतील अशा महाविद्यालयांनी आपला प्रस्ताव विद्यापीठाने ठरवून दिलेल्या अटी व शर्तीनुसार कागदपत्रांची एकत्रितरित्या पुर्तता करुन हिशोबाचे तात्काळ समायोजन न केल्यास या विभागामार्फत लागू करण्यात आलेल्या कोणत्याही योजनेचा लाभ देण्यात येणार नाही. याची नोंद घ्यावी.

सदर योजनांच्या अनुदानाची रक्कम मर्यादीत असल्याने, मागणी केलेल्या सर्वच महाविद्यालयांना अनुदान वाटप करणे शक्य होणार नाही. त्या करीता प्रथम अर्ज प्रथम प्राधान्य (First Come First Served) या तत्वाने अनुदानाच्या कमाल मर्यादेनुसार महाविद्यालयांना अनुदानाची रक्कम वाटप करण्यात येईल. **फॅक्स, ई-मेलद्वारे तसेच निर्धारित वेळेत प्राप्त न झालेले प्रस्ताव / अर्ज / कागदपत्रे ग्राहय धरण्यात येणार नाही. योजना सबंधीचे सर्व दस्ताऐवज विद्यार्थी कल्याण विभागात परस्पर स्वीकारले जाणार नाहीत. कृपया यांची नोंद घ्यावी.**

वर नमुद केलेल्या तीनही योजनांच्या सोबत जोडलेल्या माहिती पुस्तिकेतील अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे सर्व हक्क विद्यापीठाकडे राखुन ठेवण्यात आले आहेत. योजनांबाबतचा तपशील विद्यापीठाच्या **www.muhsnashik.com** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

धन्यवाद !

**सही/-**
संचालक,
विद्यार्थी कल्याण

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
**Maharashtra University of Health Sciences, Nashik**
वणी - दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२००४.
**Vani – Dindori Road, Mhasrul, Nashik – 422 004.**
**EPABX :** 0253-2539100-300, **Fax :** 0253-2539171, **Phone :** 0253-2539173
**E-mail :** sw@muhsnashik.com **Web.:** www.muhsnashik.com

**डॉ. काशिनाथ दा. गर्कळ** — **Dr. Kashinath D. Garkal**
एम.एस्सी.,पीएच.डी — M.Sc., Ph.D
**संचालक - विद्यार्थी कल्याण** — **Director – Students' Welfare**

*All correspondence be addressed to the Registrar.*

मआविवि/एसडब्ल्यू/स्किम/१५६५/११ दि. २५/११/२०११

**- परीपत्रक -**

**प्रति,**
**मा. अधिष्ठाता/प्राचार्य,**
सर्व संलग्नित महाविद्यालये

**विषय :- संजिवनी विद्यार्थी अपघात सुरक्षा विमा योजनेतंर्गत क्लेम फॉर्म पाठविणेबाबत...**

महोदय /महोदया,

परिपत्रकासोबत जोडलेल्या विषयांकीत योजनेकरीता दाव्याची रक्कम मिळणेसाठी न्यु. इंडिया एश्योरन्स कंपनी लि., नाशिक यांच्याकडून प्राप्त झालेला क्लेम फॉर्म पत्रासोबत जोडून पाठवित आहोत.

आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्याचा अपघात झाल्यास/ अपघाती मृत्यू झाल्यास सोबत जोडलेल्या क्लेम फॉर्ममधील सर्व रकाने विद्यार्थी/विद्यार्थ्याच्या पालकांकडून भरुन, विद्यार्थ्याचा प्रस्ताव योजना पुस्तिकेत नमुद केलेल्या माहितीप्रमाणे कागदपत्रांची एकत्रितरित्या पुर्तता करुन अधिष्ठाता / प्राचार्यामार्फत विद्यापीठाकडे पाठवावा. ही विनंती.

**सही/-**
संचालक,
विद्यार्थी कल्याण

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

## Maharashtra University of Health Sciences, Nashik

वणी - दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२००४.

Vani – Dindori Road, Mhasrul, Nashik – 422 004.

**EPABX :** 0253-2539100-300, **Fax :** 0253-2539171, **Phone :** 0253-2539173

**E-mail :** sw@muhsnashik.com **Web.:** www.muhsnashik.com

**डॉ. काशिनाथ दा. गर्कळ** | **Dr. Kashinath D. Garkal**

एम.एस्सी.,पीएच.डी | M.Sc., Ph.D

**संचालक - विद्यार्थी कल्याण** | *All correspondence be addressed to the Registrar.* | **Director – Students' Welfare**

मआविवि/एसडब्ल्यू/स्किम/१५६१/११ दि. २५/११/२०११

**प्रति,**
मा. अधिष्ठाता/प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,

**विषय : विद्यापीठाच्या विविध विद्यार्थी कल्याणकारी योजना आपल्या महाविद्यालयात राबविण्याबाबत.**

मा. महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपले लक्ष वेधु इच्छितो की, विद्यापीठाचे विद्यार्थ्यांप्रती दायीत्व म्हणून संलग्नित महाविद्यालयातील पात्र विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ कल्याणकारी योजना सन २००७-०८ पासुन राबवित आहे. विद्यापीठाच्या धोरणानुसार सदरील उपक्रमासाठी वित्तीय अंदाजपत्रकात या योजना राबविण्यासाठी निश्चित निधी उपलब्ध करुन दिला जातो.

या योजनांचे मागील काही वर्षापासुन अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, उपलब्ध योजनांचा लाभ मिळण्यासाठी बऱ्याच महाविद्यालयांकडून प्रस्ताव प्राप्त होत नाहीत.

परिणामतः निधी उपलब्ध असुनही त्याचा विनियोग विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी करता येत नाही तरी गरीब व होतकरु विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाने सुरु केलेल्या या कल्याणकारी योजनांचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना लाभ मिळण्यासाठी आपली भुमिका महाविद्यालयाचे अधिष्ठाता/प्राचार्य या नात्याने अतिशय महत्वाची आहे.

आपणांस विनंती करण्यात येते की, तळागळातील विद्यार्थ्यांपर्यंत जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना योजनांचा लाभ मिळण्याच्या दृष्टीने आपण या प्रकरणात व्यक्तीशः लक्ष घालून आपल्या महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडून विद्यार्थ्यांना समुपदेशन करुन योजनांचा लाभ घेण्यासाठी प्रेरीत करावे. विद्यार्थी योजनांचा लाभ घेण्यापासुन वंचित राहू नये याकरीता पत्रासोबत योजनांची माहिती पुस्तिका / नियमावली पाठवित आहोत.

धन्यवाद !

**सही/-**
संचालक,
विद्यार्थी कल्याण